केंद्र पुरस्कृत दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यात सुरु करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र.दिदयो-२०१५/प्र.क्र.१४७/ऊर्जा-५
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ जानेवारी, २०१६.

संदर्भ : शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा समक्रमांक, दिनांक २४ एप्रिल २०१५

प्रस्तावना :-

ग्रामीण भागातील वाढती ग्राहक संख्या, आधुनिक जीवनशैलीमुळे विजेचा वाढता वापर यामुळे सद्य:स्थितीत अस्तित्वात असणाऱ्या वीज वितरण प्रणालीचे विस्तारीकरण व बळकटीकरण करणे आवश्यक असल्याने ग्रामीण भागात वीजक्षेत्रातील पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरीता केंद्रशासनाने सर्व राज्यांकरिता दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना सुरु केली आहे. ही योजना महाराष्ट्र राज्यात राबविण्याकरिता मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबतचा प्रस्ताव दि. १९ जानेवारी, २०१६ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. त्यावर शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

२. केंद्र शासन पुरस्कृत दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना महाराष्ट्र राज्यात खालीलप्रमाणे सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेची उद्दिष्टे :-

अ) ग्रामीण भागातील कृषी व अकृषीक वाहिनी विलगीकरण करणे व त्याद्वारे ग्रामीण भागातील सामायिक विजवाहीनीवरुन वीज पुरवठा होत असलेल्या अकृषीक ग्राहकांना स्वतंत्र वाहिनीद्वारे २४X७ वीज पुरवठा करणे.

ब) ग्रामीण भागातील वीज वितरण प्रणालीचे सक्षमीकरण, श्रेणीवर्धन, बळकटीकरण करणे, वीज वितरण प्रणालीतील वीजहानीचे योग्य मोजमाप करण्यासाठी ऊर्जा अंकेक्षण (Energy Audit) महत्वाचे असल्याने यासाठी ग्राहकाकडे तसेच वीजवितरण रोहित्र व फीडर यावर योग्य क्षमतेचे मीटर लावणे.

क) ग्रामीण भागातील वीज पुरवठा नसलेले व दारिद्रय रेषेखालील लाभार्थी यांच्या घरांसाठी नवीन वीजजोडण्या देण्यास लागणारी वीज वितरण यंत्रणा उभारणे.

ड) संसद आदर्श ग्राम योजनेच्या गावांमध्ये वीज वितरण प्रणालीचे सक्षमीकरण व आधुनिकीकरण करणे.

३. सदर योजनेकरीता केंद्रशासनाकडून मंजूर प्रकल्प खर्चाच्या ६०% रक्कम अनुदान स्वरुपात मिळणार असून, प्रकल्प खर्चाच्या १०% रक्कम महावितरणने उपलब्ध करुन द्यावयाची असून उरलेली ३०% रक्कम वित्तीय संस्थांकडून कर्ज स्वरुपात घ्यावयाची आहे. तसेच केंद्रशासनाने नमूद केलेली उद्दिष्टे विहित वेळेत पूर्ण केल्यास अतिरीक्त १५% पर्यंत वाढीव अनुदान (एकूण कर्ज रक्कमेच्या ५०%) केंद्रशासनाकडून मिळणार आहे.

४. केंद्र शासनाने दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गत देशपातळीवर रु. ४३,०३३ कोटींची तरतुद केलेली आहे. या योजनेसाठी ग्रामीण विद्युतीकरण कार्पोरेशन (आरईसी) यांची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

५. केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार महाराष्ट्रातील ३३ जिल्ह्यांकरिता दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गत रु. २१५२.६८ कोटी इतक्या रक्कमेचे ३७ सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) स्थानिक लोक प्रतिनिधी, मा. खासदार, आमदार यांच्याशी विचारविनिमय करुन तसेच तांत्रिकदृष्या व आर्थिकदृष्या आवश्यक व्यवहार्यता तपासून तयार करण्यात आले आहेत व त्यास केंद्रशासनाने मंजूरी दिली आहे.

६. या योजने अंतर्गत महाराष्ट्रामध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांचा आर्थिक तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	कामाचा तपशील	संख्या	एकूण मंजूर रक्कम (रु. कोटी)
१	वाहिनी विलगीकरण	१६९३	७००
२	वीज प्रणाली सक्षमीकरण		१४३३.७१
३	संसद आदर्श ग्राम योजना	६९ गावे	१८.९७
एकूण रक्कम			२१५२.६८

७. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने सूचित केल्यानुसार उपरोक्त दिनांक २४ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय स्थायी समिती मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली आहे. सदर समिती महावितरण कंपनीकडून प्राप्त झालेला प्रस्ताव (DPR) तपासून पुढे REC मार्फत मॉनिटरी कमिटीच्या मंजुरीकरीता शिफारस करेल. तसेच या योजनेच्या विकासावर लक्ष ठेवणे, कामाच्या दर्जावर सनियंत्रण ठेवणे, योजनेमधील मंजूर कामांची अंमलबजावणी करतेवेळी येणारे अडथळे दूर करणे, जसे की उपकेंद्राच्या जागा ताब्यात घेताना येणारे अडथळे, वाहिन्या उभारताना मार्गिकेमध्ये येणारे अडथळे (ROW), वन विभागाची मंजूरी, रेल्वेची मंजूरी, सुरक्षाविषयक मंजूरी इत्यादी बाबींवर समितीचे नियंत्रण असणार आहे.

८. सदर योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याकरीता महाराष्ट्र शासन मे.ग्रामीण विद्युतीकरण कार्पोरेशन (आरईसी) व महावितरण यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करण्यासाठी प्रधान सचिव (ऊर्जा) यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९. सदर योजनेच्या अनुषंगाने तसेच महावितरण व महापारेषण कंपनीच्या माध्यमातून सर्व राज्य व केंद्रस्तरीय योजनांतर्गत विद्युत पायाभूत सुविधा व उपकेंद्राकरिता, राज्यातील शहर व ग्रामीण क्षेत्रात शासकीय जागा नाममात्र शुल्कात उपलब्ध करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यास तसेच जेवढा निधी सदर शासकीय जागेकरिता भरावा लागणार आहे, त्याऐवजी तेवढया निधीतून विद्युत पायाभूत सुविधा त्या शहरात वा त्या जिल्हयात वाढवून देण्याच्या अटीवर, शासकीय जमिनी दीर्घ कालावधीसाठी नाममात्र भाडेपट्ट्याने संबंधीत कंपनीस उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१०. वरील योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने महावितरण कंपनीकडून आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात येईल व त्याबाबतचा अहवाल राज्यस्तरीय स्थायी समितीच्या समोर ठेवण्यात येईल.

११. हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३८०/ २०१५, दि. ३१ ऑक्टोबर, २०१५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

१२. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१६०१२८१७२९२४२२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhimashankar Yallapa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallapa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400051, st=Maharashtra, cn=Bhimashankar Yallapa Manta
Date: 2016.01.28 17:31:49 +05'30'

(भि. य. मंता)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
४) मा. सर्व लोकसभा व राज्यसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य
५) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा, विधान भवन, मुंबई
६) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
७) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
८) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९) प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, प्रकाशगड, मुंबई-५१
११) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी, प्रकाशगड, मुंबई-५१
१२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, प्रकाशगंगा, मुंबई-५१
१३) मा. अध्यक्ष / सभापती, जिल्हा पंचायत समिती
१४) सर्व विभागीय आयुक्त
१५) सर्व जिल्हाधिकारी
१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१७) सर्व कार्यासने (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई
१८) निवड नस्ती (उर्जा-५ कार्यासन)